सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ६० वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार

## प्रवेशिका



६० वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांसाठी दिनांक ०१ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कॅलेंडर वर्षात सेन्सॉर संमत झालेल्या मराठी चित्रपटांच्या प्रवेशिका **दिनांक १६.०३.२०२४ ते दिनांक १६.०४.२०२४** पर्यंत निर्मात्यांकडून मागविण्यात येत आहेत.

या पुरस्कारांच्या प्रवेशिका खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील व त्याच कालावधीत चित्रपट प्रवेशिका सादर करता येतील.

- **प्रवेशिका अर्ज मिळण्याचे ठिकाण** : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ६५ येथे तसेच आवश्यक माहिती **www.filmcitymumbai.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- **प्रवेशिका अर्ज सादर करण्याचे ठिकाण** : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळकेचित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ६५

**स्वाक्षरी / –**
**व्यवस्थापकीय संचालक**

## महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवासाठी चित्रपट संस्थांनी भरावयाच्या प्रवेशिकेचा नमुना

१. चित्रपटाचे शीषर्क : ............................................................................

२. हा चित्रपट कथात्म चित्रपट (Feature Film) आहे काय ? : ............................................................................

३. चित्रपटाचा कालावधी : ............................................................................

४. चित्रपट निर्मात्या संस्थेचे पूर्ण नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक : ............................................................................

............................................................................

............................................................................

५. निर्मात्याचे पूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व इमेल आयडी : ............................................................................

: ............................................................................

६. निर्मात्याचे प्रथम पदार्पण आहे काय ? : ............................................................................

७. दिग्दर्शकाचे पूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व इमेल आयडी : ............................................................................

: ............................................................................

८. दिग्दर्शकाचे प्रथम पदार्पण आहे काय ? : ............................................................................

९. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने प्रदर्शित करण्यासाठी दिलेल्या शिफारसपत्राचा क्रमांक व दिनांक (प्रमाणित केलेली सत्यप्रत सोबत जोडावी) : ............................................................................

१०. चित्रपट सार्वजनिकरित्या प्रदर्शित झाला आहे काय ? : ............................................................................

असल्यास, प्रदर्शनाची जागा व दिनांक : ............................................................................

११. आपला चित्रपट दुसऱ्या चित्रपटावरुन डब केलेला आहे, दुसऱ्या चित्रपटावर आधारित आहे किंवा त्यांच्यावरुन तो पुन्हा तयार केला आहे काय ? त्याचे कृपया नाव देणे. : ............................................................................

१२. चित्रपटाची कथा स्वतंत्र आहे, रुपांतरित आहे वा आधारित असल्यास, ज्या मूळ कथेवरुन (नाटक, कादंबरी, लघुकथा इ.) ती घेतली असेल त्या कथेचे व त्या लेखकाचे नाव : ............................................................................

१३. चित्रपटात प्रमुख भूमिका करणाऱ्या कलाकारांची संपूर्ण यादी ३० प्रतीत खालील नमुन्यात वेगळ्या कागदावर देण्यात यावी. अभिनेता/अभिनेत्री यांची या चित्रपटात प्रथम पदार्पण भूमिका असेल तर तसा स्पष्ट उल्लेख यादीत असावा. सदर यादी चित्रपटाच्या प्रिन्टसोबत पाठवावी.

| भूमिका (१) | कलाकाराचे चित्रपटातील नाव (असल्यास) (२) | कलाकाराचे पूर्ण नाव (३) | कलाकाराचे पूर्ण पत्ता (टेलिफोन क्रमांकासह) (४) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**टीप :-** ही प्रवेशिका भरल्यानंतर संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार भवन, एम. जी. रोड, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे पाठवावी.

१४. खालील विभागातील तंत्रज्ञांची त्यांच्या नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह माहिती प्रवेशिकेसोबत पाठवावी :-

| **विभाग** | | **नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक** |
|---|---|---|
| १) | कथा लेखक | : ........................................................................................................ |
| २) | पटकथा लेखक | : ........................................................................................................ |
| ३) | गीत लेखक | : ........................................................................................................ |
| ४) | संवाद लेखक | : ........................................................................................................ |
| ५) | संगीत दिग्दर्शक | : ........................................................................................................ |
| ६) | पार्श्वसंगीत (बॅक ग्राऊंड म्युझिक) | : ........................................................................................ |
| ७) | ध्वनी संयोजन (साऊंड इफेक्ट) | : ........................................................................................... |
| ८) | छायालेखक | : ........................................................................................................ |
| ९) | ध्वनिमुद्रक | : ........................................................................................................ |
| १०) | ध्वनि संयोजक | : ........................................................................................................ |
| ११) | संकलक | : ........................................................................................................ |
| १२) | कला दिग्दर्शक | : ........................................................................................................ |
| १३) | पार्श्वगायक | : ........................................................................................................ |
| १४) | पार्श्वगायिका | : ........................................................................................................ |
| १५) | वेशभूषाकार | : ........................................................................................................ |
| १६) | रंगभूषाकार | : ........................................................................................................ |
| १७) | नृत्य दिग्दर्शक | : ........................................................................................................ |
| १८) | बालकलाकार | : ........................................................................................................ |

१५. प्रवेशिका सादर करणारी व्यक्ती निर्माती नसेल तर त्या व्यक्तीस : ..................................................................
निर्मात्यांनी प्रवेशिका देण्यास संमती दिली आहे काय ? सोबत अधिकारपत्र जोडावे.

मी / आम्ही प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, वर दिलेली माहिती बरोबर आणि खरी आहे.

मी / आम्ही प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, महोत्सवाचे नियम आणि अटी मला / आम्हाला मान्य आहेत.

मी / आम्ही महोत्सवाचे नियम पाळण्याचे अभिवचन देतो.

स्थळ : ....................................................................

दिनांक : ....................................................................

संपूर्ण पत्ता : ....................................................................
....................................................................
....................................................................

प्रवेशिक पाठविणाऱ्या संस्थेच्या
अधिकृत व्यक्तीची नावासह स्वाक्षरी

**टीप :-** प्रवेशिकेसोबत चित्रपटाची सेन्सॉर प्रमाणपत्राची छायांकित प्रत व कलाकार तंत्रज्ञांच्या नाव व पत्त्यांची यादी जोडावी.

## महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे नियम व अटी

१. मराठी चित्रपट व्यवसायाला राज्याश्रय देणे, कलात्मक, तांत्रिकदृष्ट्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या उच्च दर्जाचे चित्रपट निर्माण करण्याच्या प्रयत्नाला उत्तेजन देणे हे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे प्रमुख उद्देश आहेत.

२. शासन निर्णयान्वये व शासन निर्णय क्र.पुरक-२०११/प्र.क्र.१५०/सां.का.४, दिनांक १३ एप्रिल २०१२ अन्वये पारितोषिकांच्या रकमेत वाढ करुन सन २०१२-१३ पासून शासनातर्फे खालील रकमेची पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

(अ) ठरविलेल्या वर्षात सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या मराठी चित्रपटाला रु.४,००,०००/- रोख रकमेचे कै.दादासाहेब फाळके पारितोषिक (शासन निर्णय क्र.पुरक-२०११/प्र.क्र.११०/सां.का.४, दिनांक १३ एप्रिल २०१२ अन्वये) आणि त्याच्या दिग्दर्शकाला रु.२,००,०००/- रोख रकमेचे कै.भालजी पेंढारकर पारितोषिक.

(ब) ठरविलेल्या वर्षात दुसऱ्या उत्कृष्ट मराठी चित्रपटाला रु.३,००,०००/- रोख रकमेचे कै.बाबुराव पेंटर पारितोषिक (दिनांक १३ एप्रिल २०१२ शासन निर्णय) आणि त्याच्या दिग्दर्शकाला रु.१,००,०००/- रोख रकमेचे कै.राजा परांजपे पारितोषिक.

(क) ठरविलेल्या वर्षातला तिसऱ्या उत्कृष्ट ठरणाऱ्या चित्रपटाला रु.२,००,०००/- रोख रकमेचे कै.मा.विनायक पारितोषिक (शासन निर्णय क्रमांक दिनांक १३ एप्रिल २०१२ अन्वये) आणि त्याच्या दिग्दर्शकाला रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.राजा ठाकूर पारितोषिक.

(ड) ठरविलेल्या वर्षात सामाजिक प्रश्न हाताळणारा उत्कृष्ट चित्रपटास रु.१,५०,०००/- रोख रकमेचे कै.व्ही.शांताराम पारितोषिक (शासन निर्णय क्रमांक दिनांक १३ एप्रिल २०१२ अन्वये) आणि त्याच्या दिग्दर्शकाला रु.१,००,०००/- रोख रकमेचे कै.दत्ता धर्माधिकारी पारितोषिक.

(इ) उत्कृष्ट ग्रामीण प्रश्न हाताळणाऱ्या मराठी चित्रपटास रु.१,५०,०००/- रोख रकमेचे कै.दादा कोंडके पारितोषिक व त्याच्या दिर्ग्शकास रु.१,००,०००/- रोख कै.अनंत माने पारितोषिक तसेच सहकार महर्षी कै.शंकरराव मोहिते-पाटील पुरस्कार रु.५०,०००/- च्या देणगीवरील प्रतिवर्षी मिळणाऱ्या व्याजाची रक्कम, (शासन निर्णय क्र.एडब्लूडी-१०९०/२७६४१/प्र.क्र.३४०/सां.का.१,दिनांक ११ मार्च १९९३ अन्वये देय राहील.)

३. त्याशिवाय खाली विभागासाठी वैयक्तिक रोख्र रकमेचे पारितोषिक, मानचिन्ह व प्रमाणपत्रेही देण्यात येतील.

१) उत्कृष्ट अभिनेता रु.१,००,०००/- रोख रकमेचे कै.शाहू मोडक पारितोषिक व श्री.शिवाजी गणेशन् पुरस्कार (रु.१५,०००/- च्या देणगीवरील त्यावर्षी येणारी व्याजाची रक्कम शासन निर्णय क्र.एफएलएम-११७२/८२८५/एफ, दिनांक २६ जून १९७२ अन्वये)

२) उत्कृष्ट अभिनेत्री रु.१,००,०००/- रोख रकमेचे कै.स्मिता पाटील पारितोषिक

३) सर्वोत्कृष्ट कथा रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.मधुसुदन कालेलकर पारितोषिक

४) विनोदी अभिनेता रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.दामूअण्णा मालवणकर पारितोषिक

५) विनोदी अभिनेत्री रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.रत्नमाला पारितोषिक

६) सहायक अभिनेता रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.चिंतामणराव कोल्हटकर पारितोषिक

७) सहायक अभिनेत्री रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.शांता हुबळीकर पारितोषिक

८) प्रथम पदार्पण अभिनेत्री रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.रंजना देशमुख पारितोषिक

९) उत्कृष्ट पटकथा रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक

१०) उत्कृष्ट गीत रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.ग.दि.माडगुळकर पारितोषिक

११) उत्कृष्ट संवाद रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.आचार्य अत्रे पारितोषिक

१२) उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.अरुण पौडवाल पारितोषिक

१३) उत्कृष्ट छायालेखक रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.पांडुरंग नाईक पारितोषिक

१४) उत्कृष्ट ध्वनिमुद्रक रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक

१५) उत्कृष्ट संकलन रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक

१६) उत्कृष्ट कला दिग्दर्शक रु.५०,०००/- रोख रकमेचे कै.साहेबमामा उर्फ फत्तेलाल पारितोषिक

१७) उत्कृष्ट पार्श्वगायिका रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक

१८) उत्कृष्ट पार्श्वगायक रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक

१९) उत्कृष्ट वेशभूषाकार रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक

२०) उत्कृष्ट रंगभूषाकार रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक

२१) उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक

२२) उत्कृष्ट बालकलाकार रु.५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक व कै.गजानन जहागिरदार पुरस्कार (रु.७,५००/- च्या देणगीवरील त्यावर्षी व्याजाची रक्कम शासन निर्णय क्र.एडब्ल्यूडी-१०९०/२७६४१/प्र.क्र.३४०/सां.का.१, दिनं ाक ११ मार्च १९९३ अन्वये).

४. पहिल्या तीन उत्कृष्ट ठरलेल्या चित्रपटांची व सामाजिक प्रश्न हाताळणाऱ्या उत्कृष्ट चित्रपटांची रोख रकमेची पारितोषिक ते चित्रपट निर्माण करणाऱ्या संस्थांना देण्यात येतील. परंतु या चित्रपटासाठी देण्यात येणारी मानचिन्हे त्या-त्या चित्रपटाच्या निर्मात्यांना देण्यात येतील. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने जाहिर प्रदर्शनासाठी संमत केलेल्या चित्रपटांच्या श्रेयनामावलीमध्ये निर्माता व दिग्दर्शक म्हणून ज्यांच्या नावाचा उल्लेख असेल अशानाच चित्रपटाचा निर्माता आणि दिग्दर्शक समजण्यात येईल. इतर विभागासाठीही श्रेयनामावलीमधील नावाचाच विचार करण्यात येईल. निर्माता, दिग्दर्शक किंवा इतर कुठल्याही विभागामध्ये एकापेक्षा अधिक व्यक्ती असल्या तर श्रेयनामावलीमध्ये ज्याचे नाव असेल त्या प्रत्येक व्यक्तीस मानचिन्ह देण्यात येईल व रोख रकमेचे पारितोषिक मात्र विभागून देण्यात येईल. श्रेयनामावलीमध्ये दिलेल्या नावांचा क्रम बरोबर नसेल तर चित्रपट निर्मातत्या संस्थेने प्रवेशिकेमध्ये पारितोषिक किंवा पारितोषिक मिळण्यासाठी योग्य व्यक्तीचा मुद्दाम उल्लेख करावयास हवा. कुठल्याही भाषेतील चित्रपट आधारलेल्या किंवा त्यांचे भाषांतर असलेल्या किंवा त्यावरुन आकार घेतलेल्या कथेचे उत्कृष्ट पारितोषिक दिले जाणार नाही. मात्र चित्रपटाखेरीज कांदबरी, नाटक, लघुकथा व काव्य यावर आधालेल्या चित्रपटांचा या पारितोषिकांसाठी विचार करण्यात येईल. उत्कृष्ट चित्रपटासाठी पारितोषिक मिळविणाऱ्या चित्रपटांचा या पारितोषिकांसाठी विचार करण्यात येईल. उत्कृष्ट चित्रपटासाठी पारितोषिक मिळविणाऱ्या चित्रपटालाच वरील पारितोषिक देण्यात येईल असे नाही.

५. राज्य पारितोषिके प्रतिवर्षी ठरलेल्या तारखेला दिली जातील. या नियमात दिलेल्या कालावधीमध्ये सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने जाहीर प्रदर्शनासाठी संमत केलेल्या पूर्ण लांबीच्या सर्व मराठी चित्रपटांना प्रवेशिका पाठविता येतील. प्रवेशिका चित्रपट निर्माण करण्याऱ्या संस्थेने किंवा तिने अधिकार दिलेल्या व्यक्तिने नियमासोबत जोडलेल्या ठरविक नमुन्यात अर्जामध्ये पाठवावयास हव्यात.

६. **१ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने संमत केलेल्या सर्व पूर्ण लांबीच्या मराठी चित्रपटांना महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवामध्ये भाग घेता येईल.**

७. प्रवेशिका पाठविण्यासाठी प्रवेश मूल्य ठेवण्यात आलेले नाही. परंतु महोत्सवात प्रवेशिका पाठविणाऱ्या संस्थेने संचालक, सांस्कृतिक कार्य यांना किंवा त्यांनी नेमलेल्या अधिकृत व्यक्तींना खालील गोष्टी स्वखर्चाने पुरविल्या पाहिजेत :-

(अ)DCP (2K Resolution)

(ब) चित्रपटाच्या कथानकांच्या सारांशाच्या त्याचप्रमाणे चित्रपटात समाविष्ट केलेल्या सर्व गीतांच्या प्रत्येकी ३० प्रती चित्रपटातील प्रत्येक गीतांच्या पुढे गीतकाराचे व ते गीत गाणाऱ्या गायकाचे वा गायिकाचे वा गायिकेचे नाव स्पष्टपणे लिहिले पाहिजे. या शिवाय चित्रपटाच्या कथानकाच्या इंग्रजी सारांशाच्या ५ प्रती.

(क) चित्रपटात काम करणाऱ्या सर्व प्रमुख कलाकारांची, तंत्रज्ञांची त्यांच्या संपूर्ण नाव, पत्त्यांसह यादी ३० प्रती.

(ड) फोटोसेट, पोस्टर्स, शोकार्ड, स्लाईडस, निर्माता दिग्दर्शक, तंत्रज्ञ व प्रमुख कलाकारांची पासपोर्ट आकाराची छायाचित्रे, तसेच चित्रपटातील प्रसंगाची दोन ४" x ५" साईजची छायाचित्रे इत्यादी साहित्य, पासपोर्ट छायाचित्राव्यतिरिक्त इतर साहित्य चित्रपट महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभानंतर संस्थेस परत केले जाईल.

८. एखादा चित्रपट पूर्ण लांबीचा फिचर फिल्म आहे किंवा नाही याबाबतचा निर्णय महाराष्ट्र शासन देईल. सामान्यत: जो चित्रपट दुसऱ्या चित्रपटावरुन डब केलेला नाही किंवा त्यांच्यावरुन तो पुन्हा तयार केला नसेल किंवा त्यांच्यावर तो आधारलेला नसेल तर महोत्सवासाठी त्याची प्रवेशिका स्विकारण्यास तो चित्रपट योग्य ठरविला जाईल. परंतु महाराष्ट्र शासन एखादा चित्रपट दुसऱ्या चित्रपटावर आधारित असला किंवा यावरुन तो पुन्हा तयार केला

असला आणि तरीही मराठी चित्रपटसृष्टीत त्याने नवी भर घातली आहे असे समाधारकारक वाटल्यास त्या चित्रपटाची प्रवेशिका स्विकारील. अक्षर वाड्मय पौराणिक व ऐतिहासिक कथा यावर आधारलेल्या कथा केवळ त्यांच्या विषयामुळे आधारीत आहे असे मानले जाणार नाही.

९. शासन ठराविक मुदत देऊन राज्य पारितोषिकासाठी प्रवेशिका मागवील. काही अपवादात्मक प्रसंगी या मुदतीत सूट देण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनाने आपल्याकडे राखून ठेवला आहे.

१०. चित्रपटाची प्रिंट (असल्यास) आणि प्रसिद्धी साहित्य नेमलेल्या अधिकाऱ्याकडे पाठविण्याचा व परत नेण्याचा सर्व खर्च प्रवेशिका पाठविणाऱ्यांनी करावयाचा आहे. सर्व चित्रपट प्रवेशिका पाठविणाऱ्या संस्था आपल्या स्वतःच्या जोखमीवर प्रिंट पाठवतील. शासन चित्रपटाची प्रिंट काळजीपूर्वक सांभाळील. परंतु ती प्रिंट हरवली किंवा तीत काही बिघाड झाला तर त्याची जबाबदारी शासन स्वीकारणार नाही. प्रसिद्धी साहित्याबाबतही हाच नियम लागू पडेल.

११. शासनाने नियुक्त केलेली परीक्षक मंडळे महोत्सवासाठी आलेले सर्व चित्रपट पाहतील. त्यातून महोत्सवातील प्रदर्शनासाठी १० चित्रपटांची निवड करतील.

१२. परीक्षक मंडळाचे सदस्य सन्मान्य राहतील. परंतु त्यांना शासनाने मंजूर केल्याप्रमाणे मानधन, प्रवास खर्च इत्यादी दिला जाईल. परीक्षक मंडळाने केलेल्या शिफारशींचा विचार करुन शासन राज्य पारितोषिक वितरण समारंभामध्ये निकाल जाहीर करील.

१३. परीक्षक मंडळ योग्य अशा स्थळी आणि वेळी चित्रपटांचे परीक्षण करतील.

१४. परीक्षक मंडळ हे दोन फेरीमध्ये किंवा आवश्यकतेनुसार ज्यादा फेरीमध्ये काम करतील. प्रथम फेरीत १३ परीक्षक (१३ विभागासाठी नियुक्त केलेले) तसेच ३ संकलक असे एकूण १६ जणांचे प्राथमिक फेरीचे परीक्षक, मंडळ सर्व चित्रपटांचे परीक्षण करुन खाली तांत्रिक पारितोषिके अंतिमरित्या निश्चित करुन त्यांचा निकाल संचालक सांस्कृतिक कार्य यांचेकडे देतील :-

१) उत्कृष्ट छायालेखन

२) उत्कृष्ट कलादिग्दर्शक

३) उत्कृष्ट संकलन

४) उत्कृष्ट ध्वनिमुद्रण

५) उत्कृष्ट ध्वनि संयोजन

६) उत्कृष्ट रंगभूषाकार

७) उत्कृष्ट वेशभूषाकार

८) उत्कृष्ट बालकलाकार

१५. इतर पारितोषिकांसाठी सदर परीक्षक मंडळ तीन/तीन नामनिर्देशन (प्रत्येक पारितोषिकासाठी) शिफारस करुन प्राथमिक फेरीचा निकाल संचालकाकडे देतील. संचालक, सांस्कृतिक कार्य हे वरील प्राप्त झालेले दोन्ही निकाल पत्रकार परिषदेमध्ये जाहीर करतील.

१६. अंतिम फेरीसाठी परीक्षकांचे मंडळ (संकलक) असेल आणि ते प्रथम फेरीच्या परीक्षक मंडळाने नामनिर्देशनाची शिफारस केलेल्या चित्रपटाचे पारितोषिके वितरण समारंभापूर्वी अगोदर परीक्षण करुन प्रत्येक पारितोषिकासाठी एका नावाची अंतिमरित्या निवड करेल. प्रत्येक पारितोषिकाचा निकाल स्वतंत्र लिफाफ्यात सीलबंद करुन संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे पारितोषिक वितरण समारंभाचे दिवशी सुपुर्द करेल. हा निकाल घोषित होईपर्यंत गुप्त ठेवण्याची जबाबदारी या परीक्षण मंडळाची राहील.

१७. शासनाने महोत्सवासाठी चित्रपटांची केलेली निवड त्याचप्रमाणे जाहीर केलेली राज्य पारितोषिके यासंबंधीचे निर्णय अंतिम राहतील व स्पर्धकांना ते बंधनकारक राहतील. प्रवेशिका पाठविणाऱ्या संस्थेचा तिचा चित्रपट महोत्सवामध्ये जाहीररीत्या दाखविण्यास आक्षेप किंवा विरोध असता कामा नये. महोत्सवासाठी प्रेक्षकांची उपस्थिती नियमित करण्यासाठी नाममात्र प्रवेश मूल्य ठेवले जाईल.

१८. शासन ठरविल त्या स्थळी आणि वेळी पारितोषिके वितरण समारंभ ठेवला जाईल.

१९. राज्य पारितोषिक मिळविणाऱ्या व्यक्ती या समारंभात स्वखर्चाने हजर राहतील.

२०. चित्रपटात काम करणाऱ्या कलाकारांच्या नावाची यादी ३० प्रतीत पुढील तपशिलानुसार देण्यात यावी. सदर यादी चित्रपटाच्या प्रिंट सोबत पाठवावी :-

| अनुक्रमांक | चित्रपटातील भूमिकेचे नाव | भूमिका सादर करणाऱ्या कलाकाराचे नाव | कलाकाराचा पूर्ण पत्ता संपर्क क्रमांकासह (पासपोर्ट साईज छायाचित्र) |
| --- | --- | --- | --- |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |